मराठी न्यूज एक्सप्रेस

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२




# पिंपरीतून आमदार अण्णा बनसोडे यांना उमेदवारी नकोच..

## महायुतीच्या माजी नगरसेवकांनी बैठकीत केला 'हा' ठराव : माजी नगरसेवकांनी नाराजी दर्शवत त्यांच्या उमेदवारीला विरोध केला आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी विधानसभेचे विद्यमान आमदार अण्णा बनसोडे यांच्या विरोधात महायुतीतील अनेक माजी नगरसेवकांनी नाराजी दर्शवत त्यांच्या उमेदवारीला विरोध केला आहे. अजित पवारांच्या बंडाच्या वेळी शेवटपर्यंत साथ देणाऱ्या आमदार अण्णा बनसोडे यांना अजित पवार उमेदवारी देणार का? हा महत्त्वाचा प्रश्न आहे. पिंपरीतील एका हॉटेलमध्ये महायुतीतील चारही घटक पक्षांच्या माजी नगरसेवकांनी आणि इच्छुकांनी बैठक घेऊन आपली दिशा स्पष्ट केली आहे.

महायुतीच्या फॉर्म्युल्यानुसार ज्या पक्षाचा आमदार त्याच पक्षाला ती जागा दिली जाणार आहे. त्यामुळे पिंपरी विधानसभेत आमदार अण्णा बनसोडे यांच्या नावाची चर्चा असताना त्यांच्या उमेदवारीला महायुतीतील



अनेक माजी नगरसेवकांनी विरोध दर्शवला आहे. अजित पवार गटाचे काळूराम पवार, भाजपचे राजेश पिल्ले, शिंदे गटाचे जितेंद्र ननावरे आणि आरपीआयच्या चंद्रकांता सोनकांबळे हे चार जण पिंपरी विधानसभेतून इच्छुक आहेत. या चारही जणांसह इतर माजी नगरसेवकांनी अण्णा बनसोडे हे निष्क्रिय आमदार असून त्यांना आमदारकीची उमेदवारी देऊ नये असा ठराव केला आहे.

जर आमदार अण्णा बनसोडे यांना उमेदवारी देण्यात आली तर आम्ही त्यांचा प्रचार करणार नाहीत. अशी भूमिका देखील महायुतीतील चारही घटक पक्षातील माजी नगरसेवकांनी घेतली आहे. अजित पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली तेव्हा हेच अण्णा बनसोडे अजित पवारांच्या सोबत होते. महायुतीमधून आमदार अण्णा बनसोडे यांना विरोध केल्यानंतर अजित पवार आमदार अण्णा बनसोडे यांना साथ देणार का? हे पाहावं लागणार आहे.

# पहिल्या दिवशी 29 जणांनी 59 नामनिर्देशन पत्र नेले

## निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयातुन एकुण 59 नामनिर्देशन अर्जांची

**पिंपरी | प्रतिनिधी**

२०६ पिंपरी (अ.जा) विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीच्या अनुषंगाने आज दिनांक २२/१०/२०२४ रोजी विहित वेळेत पहिल्या दिवशी एकुण २९ व्यक्तींनी निगडी येथील २०६ पिंपरी (अ.जा) विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयातुन एकुण ५९ नामनिर्देशन अर्जांची खरेदी केली आहे.

आज नामनिर्देशन पत्रे घेणाऱ्या व्यक्तींची नावे व त्यांनी नोंदविलेल्या माहितीचा तपशील :-




बाळासाहेब नामदेव ओव्हाळ, सचिन महीपती सोनवणे (वंचित बहुजन आघाडी), चंद्रकांत महादेव लोंढे (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस), युवराज भगवान दाखले (शिवशाही व्यापारी संघ), मनोज विष्णू कांबळे (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस), दादाराव किसन कांबळे (लोकसेवा पत्रकार असो.), अनिकेत धोडींबा सोनवणे, नवनाथ चंद्रकांत शिंदे, राजेंद्र मानसिंग छाजछिडक, (भारतीय राष्ट्रीय जनता पार्टी, राष्ट्रीय बाल्मीकी सेना यांची राष्ट्रीय संयुक्त आघाडी), सुरज चंद्रकांत गायकवाड (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस), मनोज भास्कर गरबडे (वंचित बहुजन आघाडी), राजु सुदाम भालेराव (महाराष्ट्र नवनिर्मान सेना), रविंद्र रामदास ओव्हाळ, बाबा बाळु कांबळे, चंद्रकांता लक्ष्मण सोनकांबळे, सुंदर मसुकांत कांबळे, नाथा खंडु शिंदे (महाराष्ट्र नवनिर्माण सेना), निलेश उल्हास नेटके (म.न.से), अण्णा दादु बनसोडे, (राष्ट्रवादी काँग्रेस), सुधिर हिंदुराव कांबळे, सुरेश मधुकर लोंढे (राष्ट्रवादी काँग्रेस, अजितदादा पवार), प्रा. डॉ. हेमंत अरुण देवकुळे (भा.ज.पा./ अपक्ष), अँड. गौतम सुखदेव चाबुकस्वार, (शिवसेना उ.बा.ठा), दिपक सौदागर रोडे, शैल विश्वास कांबळे, धर्मेंद्र किसन क्षीरसागर (भा.ज.पा), शैलेंद्र उर्फ विवेक विष्णू विधाते (राष्ट्रवादी काँग्रेस,शरदचंद्रजी पवार), देवेंद्र सहदेव तायडे, डॉ. काशिनाथ महादेव बामणे असे निवडणूक निर्णय अधिकारी अर्चना यादव यांनी कळविले आहे.

# शिधापत्रिकाधारकांचा ऐन दिवाळीत होणार हिरमोड

## शिधापत्रिकाधारक यंदा सणाच्या दिवशी आनंदाच्या शिधापासून वंचित राहणार आहेत.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील शिधापत्रिकाधारक यंदा सणाच्या दिवशी आनंदाच्या शिधापासून वंचित राहणार आहेत. आचारसंहितेत आनंदाचा शिधा वाटपाला खो बसला आहे. त्यामुळे दिवाळीत शहरातील साडे तीन शिधापत्रिकाधारकांचा हिरमोड होणार आहे.

दिवाळीत राज्य शासनाकडून दरवर्षी शंभर रुपयांमध्ये आनंदाचा शिधा देण्यात येतो. त्यामध्ये साखर, रवा, हरभराडाळ व तेल (प्रत्येकी एक किलो) अशा चार वस्तूंचा समावेश असतो. पिंपरी-चिंचवडमध्ये भोसरी, चिंचवड आणि पिंपरी हे तीन कार्यालयांतर्गत साडे तीन लाख शिधापत्रिकाधारकांचा समावेश होतो. त्यांना या योजनेचा लाभ होतो. मात्र, यंदाच्या दिवाळीत या आनंदाच्या शिधाचे वाटप करण्यात येणार नसल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. सध्या



विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्याने हे शिधावाटप थांबवले आहे. या वस्तू एकत्रितपणे ज्या पिशवीतून दिल्या जातात. त्यावर सत्ताधाऱ्यांची छायाचित्रे असल्याने अडचण निर्माण झाली होती. मात्र, आता हा शिधाच वाटपण्यात येणार नसल्याने शिधापत्रिकाधारकांमध्येही नाराजीचा सूर आहे.

> 'दरवर्षी आनंदाचा शिधा दिला जातो. यंदाच्याही वर्षी मिळणे अपेक्षित होते. मात्र, तो येणार नसल्याचे समजले. निवडणुकीमुळे नागरिकांना वाटप करणे थांबविणे चुकीचे आहे."
> **- आनंद थोरात, शिधापत्रिकाधारक.**

> "दरवर्षी आनंदाचा शिधा वाटप केला जातो. मात्र, यंदा त्याचे वाटप केले जाणार नाही."
> **- गजानन देशमुख, परिमंडल अधिकारी, भोसरी.**

# अभ्यासिकांच्या विरोधात विद्यार्थी संघटनांची जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव

## पुण्याच्या मध्यवर्ती भागात पावला पावलावर शिक्षणाशी संबंधित संस्था, क्लास, मार्गदर्शन केंद्र, तसेच अभ्यासिका थाटल्या आहेत.

**पुणे | प्रतिनिधी**

विद्येचे माहेर घर असलेल्या पुण्याच्या मध्यवर्ती भागात पावला पावलावर शिक्षणाशी संबंधित संस्था, क्लास, मार्गदर्शन केंद्र, तसेच अभ्यासिका थाटल्या आहेत. राज्यभरातून लाखो विद्यार्थी स्पर्धा परीक्षांची तयारी करण्यासाठी शहरात आले आहेत. अभ्यास करुन अधिकारी होण्याचे स्वप्न बाळगणाऱ्या विद्यार्थ्यांच्या जिवावर धंदे तेजीत आहेत. परंतु विद्यार्थ्यांच्या सुरक्षितेची कोणतीही काळजी घेतलेली दिसून येत नाही. त्यामुळे शहरातील विद्यार्थी संघटना आक्रमक झाल्या असून थेट जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव घेत शहरातील अभ्यासिकांची तपासणी करुन विद्यार्थ्यांना जीव वाचवावा, अशी मागणी केली आहे. तसेच याकडे दुर्लक्ष केल्यास रस्त्यावर उतरण्याचाही इशारा दिला आहे.

पुण्यातील गांजवे चौकातील ध्रुवतारा ही अभ्यासिका शनिवारी लागलेल्या आगीत जळून खाक झाली. शहरात २५० हून अधिक अभ्यासिका आहेत. या अभ्यासिकेत लाखो विद्यार्थी अभ्यास करत असतात. या अभ्यासिकांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी कोणतीही व्यवस्था करण्यात आलेली नाही. शहरातील एकाही अभ्यासिकेने अग्निसुरक्षा लेखापरीक्षण (फायर ऑडिट) करण्याचा साधा एकही अर्ज केला नसल्याची माहिती समोर आली आहे. याबाबतचे वृत्त सीविक मिररमध्ये प्रसिध्द करण्यात आले आहे. त्यानंतर आता विद्यार्थी संघटनांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. पुणे महापालिकेचे आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी अभ्यासिकांची तपासणी करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार आता महापालिका प्रशासनाकडून तपासणीची धडक मोहिम हाती घेतली जाणार आहे.

स्पर्धा परीक्षा विध्यार्थी असोसिएशन आणि युवासेने या घटनेनंतर विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी मोहिम हाती घेतली आहे. संघटनांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी कायमस्वरुपी उपाययोजना तसेच नियमावली प्रशासनाने तयार करावी. जेणेकरुन भविष्यात विद्यार्थ्यांना कोणताही त्रास होणार नाही. अशी माणगी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. शहरातील शनिपार, सदाशिव पेठ, गांजवे चौक, नवी पेठ, एस पी कॉलेजच्या आजूबाजूचा परिसर, फडके हौद, आप्पा बळवंत चौक, कोथरुड, कर्वे नगर, हडपसर, खराडी, पिंपरी-चिंचवड या भागासह इतर भागात छोट्या इमारतींसह जून्या वाड्यांमध्ये अभ्यासिका उभारण्यात आल्या आहेत. अभ्यासिकांच्या क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. तसेच मोठ्या प्रमाणात शुल्क आकारले जाते. परंतु तेवढ्या सुविधा दिला जात नाही. अशा तक्रारी विद्यार्थ्यांनी केल्या आहेत.



### सर्व अभ्यासिका तसेच वसतिगृह यांचे ऑडिट करावे

» फायर सेफ्टी ची साधने कोणत्याही अभ्यासिकेत नाहीत. अचानक आग लागली तर मोठी दुर्घटना होऊ शकते. त्यामुळे पालिकेच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व अभ्यासिका तसेच वसतिगृह यांची माहिती घेऊन त्यांचे ऑडिट करावे. व धोकादायक इमारतींमध्ये सुरु असलेल्या अभ्यासिकांवर कारवाई करावी. या पूर्वी देखील दोन वेळा निवेदन देण्यात आले होते. पण कोणत्याही प्रकारची कारवाई पालिका प्रशासनाकडून करण्यात आली नाही. आत्ता जर आपण अशा अभ्यासिका तसेच वसतिगृहावर कारवाई केली नाही. व दुर्दैवाने काही अनुचित प्रकार घडला तर त्याला सर्वस्वी पालिका प्रशासन जबाबदार राहील. असे जिल्हाधिकारी तसेच महापालिकेला दिलेल्या निवेदनात असोसिएशन या संघटनेने नमूद केले आहे.

> शहरात रोज नव्याने अभ्यासिका सुरु होत आहेत. या अभ्यासिका सुरु करताना केवळ आर्थिक फायद्याचा विचार केला जातो. परंतु विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा कोणीही विचार करत नाही. अनेक इमारतींच्या पार्किंगमध्ये अभ्यासिका सुरु केल्या आहेत. याची तपासणी महापालिकेने करावी, कडक कारवाई करुन विद्यार्थ्यांचा जीव वाचवा.
>
> **- महेश घरबुडे, अध्यक्ष- स्पर्धा परीक्षा विध्यार्थी असोसिएशन.**

> खेड्यापाड्यातून अनेक विद्यार्थी केवळ अभ्यासासाठी पुण्यात आलेले आहे. घरी अभ्यासाचे वातावण नसते म्हणून महिन्याला एक हजार ते दोन हजार रुपये खर्च करुन अभ्यासिकेत प्रवेश घेतला जातो. परंतु त्या बदल्याच खरच सुविधा दिल्या जातात का हा देखिल मोठा प्रश्न आहे. लाखो विद्यार्थी एकप्रकारे त्यांचा जीव धोक्यात घालूनच अभ्यास करत आहेत. याची आता जाणिव होत आहे. त्यामुळे अभ्यासिकांसाठी धोरण असणे खूप आवश्यक आहे.
>
> **- स्वप्नील पाटील, विद्यार्थी.**

# रोख स्वरुपात 50 हजार रुपयेच बाळगता येणार

## अधिक रक्कम असेल, तर हिशेब द्यावा लागणार

**पुणे | प्रतिनिधी**

-विधानसभा निवडणुकीमध्ये "मनी पॉवर'ला आळा घालण्यासाठी निवडणूक आयोग कसोशीने प्रयत्न करत आहे. नागरिकांना रोख स्वरुपात 50 हजार रुपयेच बाळगता येणार आहे. त्यापुढील रक्कम जवळ असेल तर त्या रकमेचा हिशेब ठेवणे आवश्यक आहे. जिल्ह्यात एकूण 350 पथके स्थापन केली आहेत.

भरारी अथवा तपासणी पथकातील अधिकाऱ्यांनी या रकमेचा हिशोब मागितल्यास संबधित व्यक्तींनी त्या रकमेचा हिशोब दाखविणे आवश्यक आहे. अधिकाऱ्यांना याबाबतची सत्यता पटल्यास ती रक्कम परत केली जाईल, असे जिल्हा प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले. मुक्त आणि निपक्ष निवडणुकांसाठी पैशांचा गैरवापर रोखणे आवश्यक आहे. निवडणुकीच्या काळात होणारी पैशांची देवाणघेवाण या प्रकाराला आळा घालण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून विविध उपाययोजना करण्यात येत आहे. त्यासाठी निवडणूक आयोगाने निवडणूक खर्च देखरेख यंत्रणा स्थापन केली आहे.



बेकायदेशीर निधीला आळा घालण्यासाठी प्राप्तीकर विभाग, परकीय चलनाचा गैरवापर रोखण्यासाठी सक्तवसुली संचालनालय आणि राजकीय पक्षांकडून होणारा पैशांचा गैरवापर टाळण्यासाठी पोलीस आणि उत्पादन शुल्क विभागाची मदत घेतली जात आहे.

भरारी अथवा स्थिर पथकातील तपासणीमध्ये 10 लाखांपर्यंतची रोख रक्कम आढळल्यास ती जप्त करून जिल्हा प्रशासनामार्फत संबंधित व्यक्तीला नोटीस पाठवून त्यांच्याकडून या रोख रकमेचा हिशेब तसेच ही रक्कमेबाबतचा तपशील, कागदपत्रे मागविली जाणार आहे. जिल्हा प्रशासनातील अधिकारी यांच्याकडे याकडे याबाबतची सुनावणी होणार आहे.

# दिवाळी सणानिमित्त शहरातील वाहतुकीत मोठे बदल

## 5 नोव्हेंबर 2024 पर्यंत वाहतुकीत बदल करण्यात आले आहेत.

**पुणे | प्रतिनिधी**

दिवाळी सणानिमित्त पुणे शहरातील मध्यवर्ती भागात बाजारपेठांमध्ये खरेदीकरीता ग्राहकांची मोठ्या प्रमाणात होणारी गर्दी लक्षात घेता शहरातील वाहतूक सुरळीत रहावी म्हणून ५ नोव्हेंबर २०२४ पर्यंत वाहतुकीत बदल करण्यात आले आहेत.



याअंतर्गत शिवाजीनगरवरून शिवाजी रोडने जाणारी चारचाकी वाहने स. गो. बर्वे चौकातून जाणारी वाहतूक जंगली महाराज रस्ता- टिळक चौक या पर्यायी मार्गाने वळविण्यात येत आहे.

स्वारगेटवरून बाजीराव रोडने शिवाजीनगरकडे पुरम चौक मार्गे जाणारी चारचाकी वाहने पुरम चौकातून डावीकडे वळून टिळक रोडने एस. पी. कॉलेज अलका चौक मार्गे इच्छितस्थळी जातील.

आप्पा बळवंत चौकातून बुधवार चौकाकडे येणारी वाहतूक आवश्यकतेनुसार बंद करण्यात येईल. ही वाहने बाजीराव रोडने सरळ पुढे इच्छितस्थळी जातील.

फुटका बुरूज वरून जोगेश्वरी चौकाकडे येणारी वाहतूक आवश्यकतेनुसार बंद करण्यात येईल. त्यासाठी इच्छितस्थळी जाण्यासाठी शिवाजी रोडवरुन सरळ पुढे जाणारा पर्यायी मार्ग राहील.

शनिपार चौकाकडून तसेच कुमठेकर रोडवरून मंडईकडे जाणारी वाहतूक आवश्यकतेनुसार बंद करण्यात येईल. याकरिता पर्यायी मार्ग म्हणून बाजीराव रोडने सरळ पुढे जाता येईल.

# मतदारांना मताधिकार बजावण्यासाठी प्रोत्साहित करा

## असे आवाहन 205 चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी अनिल पवार यांनी केले.

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरी मतदानाचा टक्का अधिकाधिक वाढविण्यासाठी स्वीपच्या माध्यमातून प्रयत्न सुरु असून प्रसारमाध्यमांनी देखील याबाबत पुढाकार घेऊन जनजागृती करावी तसेच मतदारांनी आपला संविधानिक हक्क बजावण्यासाठी उत्स्फुर्तपणे मतदान करून इतर पात्र मतदारांना मताधिकार बजावण्यासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन २०५ चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी अनिल पवार यांनी केले.



महाराष्ट्र राज्य सार्वत्रिक विधानसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने २०५ चिंचवड विधानसभा मतदासंघातील निवडणुक कामकाजाबाबत माहिती देण्यासाठी थेरगाव येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या 'ग' क्षेत्रिय कार्यालयाच्या नवीन प्रशासकीय इमारतीमधील तिसऱ्या मजल्यावरील बापूजी बुवा सभागृहामध्ये पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी माहिती देताना अनिल पवार बोलत होते. यावेळी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी अमोल कदम, किशोर ननवरे,निवडणूक कार्यालयातील अधिकारी यांच्यासह पत्रकार उपस्थित होते.

महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोगाद्वारे आदर्श आचार संहिता लागू करण्यात आली आहे. त्यानुसार निवडणुकीची अधिसूचना २२ ऑक्टोबर २०२४ रोजी प्रसिद्ध होणार आहे. त्या दिवसापासून उमेदवारांचे नामनिर्देशनपत्र भरण्यास सुरुवात होणार असून २९ ऑक्टोबर २०२४ पर्यंत उमेदवार नामनिर्देशनपत्र दाखल करू शकतात. त्यानंतर ३० ऑक्टोबर रोजी या नामनिर्देशनपत्रांची छाननी होणार आहे. ४ नोव्हेंबर हा उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा अंतिम दिवस असणार आहे. उमेदवार निश्चित झाल्यानंतर मतदान २० नोव्हेंबर तर मतमोजणी २३ नोव्हेंबर रोजी पार पडणार आहे. अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी अनिल पवार यांनी प्रसारमाध्यमांना दिली.

**पोलीस प्रशासनासोबत बैठक..**

२०५ विधानसभा मतदारसंघातील निवडणूक प्रक्रिया सुरळीत, पारदर्शक आणि शांततापूर्ण वातावरणात पार पाडण्यासाठी पोलीस प्रशासनासह विविध यंत्रणांनी समन्वय ठेऊन कामकाज करावे, अशा सूचना निवडणूक निर्णय अधिकारी अनिल पवार यांनी दिल्या.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या पार्श्वभूमीवर २०५ चिंचवड विधानसभा मतदारसंघातील कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने तसेच आवश्यक पोलीस यंत्रणेच्या आराखड्याबाबत चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी अनिल पवार यांनी आढावा घेतला.

थेरगाव येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या 'ग' क्षेत्रिय कार्यालयाच्या नवीन प्रशासकीय इमारतीमधील तिसऱ्या मजल्यावरील बापूजी बुवा सभागृहामध्ये झालेल्या बैठकीस सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी अमोल कदम, किशोर ननवरे, निवडणूक कार्यालयातील अधिकारी उपस्थित होते. सहाय्यक पोलीस आयुक्त सुनील कुराडे, सचिन हिरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक निवृत्ती कोल्हटकर, महेश बनसोडे, पोलीस निरीक्षक राजेंद्र बहिरट, नीता गायकवाड, दीपक गोसावी, सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल कुंभार आदी उपस्थित होते.

### राजकीय पक्षासोबत बैठक संपन्न..

» निवडणूक प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडण्यासाठी राजकीय पक्षांनी निवडणूक यंत्रणेला सहकार्य करावे. आदर्श आचारसंहितेचे भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी. भारत निवडणूक आयोगाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या सूचनांचे पालन करावे, अशा सूचना निवडणूक निर्णय अधिकारी अनिल पवार यांनी केले. २०५ चिंचवड विधानसभा मतदासंघातील निवडणुकीच्या अनुषंगाने विविध राजकीय पक्षांना निवडणूक प्रक्रीयेसंबंधित माहिती देण्यासाठी थेरगाव येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या 'ग' क्षेत्रिय कार्यालयाच्या नवीन प्रशासकीय इमारतीमधील तिसऱ्या मजल्यावरील बापूजी बुवा सभागृहामध्ये बैठक संपन्न झाली, यावेळी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी अमोल कदम, किशोर ननवरे,निवडणूक कार्यालयातील अधिकारी यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी तसेच प्रतिनिधी उपस्थित होते.

# कामगार न्यायालयासाठी पाठपुरावा करणार!

## आमदार महेश लांडगे यांचा कामगारांच्या बैठकीत संकल्प : 'विजयाची हॅटट्रीक' करण्यासाठी महिंद्राच्या कामगारांची एकजूट

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड ही कामगार नगरी आहे. शहरातील लघु व मध्यम उद्योगांमध्ये तसेच विविध कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या कामगारांना, युनियमच्या प्रतिनिधींना कामगार - व्यवस्थापन वादाबाबत पुणे-मुंबईत जावे लागते. मोशी येथे पिंपरी-चिंचवड न्यायालय संकुल उभारणीची पायाभरणी झाली आहे. आगामी काळात शहरात कामगार न्यायालय निर्माण व्हावे. यासाठी सर्वोतोपरी पाठपुरावा करणार आहे, असा संकल्प आमदार महेश लांडगे यांनी केला.




महिंद्रा अँड महिंद्रा कंपनी कामगारांच्या वतीने कृतज्ञता संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. स्वाभिमानी कामगार संघटना, महिंद्रा अँड महिंद्रा वेहिकल्स, लॉजिस्टिक, हेवी इंजिनचे सभासद या संमेलनामध्ये सहभागी झाले होते.

संमेलनामध्ये आमदार महेश लांडगे, माजी महापौर राहुल जाधव, स्वाभिमानी कामगार संघटनेचे नेते रोहिदास गाडे, अध्यक्ष जीवन यळवंडे, टाटा मोटर्स कार प्लांटचे योगेश तळेकर तसेच महिंद्रा कंपनीचे कर्मचारी प्रदीप तळेकर, राहुल तळेकर, पंकज लांडगे, अजय घाडगे, शुभम बवले, सचिन वहिले, सुरज लांडगे, आकाश गव्हाणे, गणेश भुजबळ, सचिन धापटे, सुयोग भालेकर, संतोष भुजबळ, विक्रम पाटील, प्रवीण नाळे, राजू मदगे, प्रशांत म्हस्के आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन सचिन धापटे यांनी केले.

कामगार-मालक यांच्यातील वातावरण सामंजस्य व सौहार्दाचे राहावे, या दृष्टीने आमदार महेश लांडगे यांनी प्रयत्न केले आहेत. कंपनीमध्ये काही प्रसंगी तणाव निर्माण झाल्यास वाटाघाटीने प्रश्न सोडविले. कामगारांसाठी कायम मातृत्वाच्या भूमिकेतून त्यांनी कंपनी व्यवस्थापन आणि कामगारांमध्ये संवाद ठेवला. कंपनी व्यवस्थापन आणि कामगारांमधील संबंध बिघडू दिले नाहीत. कामगारांना किमान वेतन आणि मूलभूत सुविधांसह इतर अनेक लाभ मिळवून देण्यासाठी आमदार नेहमीच प्रयत्नशील असतात. त्यांच्या या पुढाकारातून अनेक कामगार आज स्थिरस्थावर झाले आहेत. भारतीय जनता पक्षाने त्यांना यंदा ' हॅट्रिक' करण्याची संधी दिली. आता त्या संधीचे सोने कामगार करणार आहेत, असा विश्वास कामगारांनी व्यक्त केला.

या संमेलनामध्ये कामगारांनी ईएसआय रुग्णालय मोहननगर, चिंचवड परिसरात असल्यामुळे भोसरी विधानसभा मतदारसंघ परिसरातील कामगारांना रुग्णसेवा घेण्यासाठी मोठा पल्ला गाठावा लागतो. अत्यावश्यक गरज पडल्यास या रुग्णालयात पोहोचेपर्यंत कामगाराची दमछाक होऊन जाते. त्यामुळे भोसरी परिसरातच ईएसआय रुग्णालय असावे . कामगार न्यायालय सुद्धा पुणे परिसरात असल्यामुळे कामगारांना ये-जा करताना वेळ आणि पैसा हे दोन्ही खर्च करावे लागतात.त्यामुळे पिंपरी चिंचवड परिसरामध्ये न्यायालय संकुल उभारण्यासाठी आपण ज्याप्रमाणे पुढाकार घेतला. तसेच कामगार न्यायालय भोसरीतील न्यायालय संकुलात असावे अशी मागणी कामगारांनी या संमेलनात केली.

# खराब हवामानामुळे पुणेकर बेजार!

## नागरिक आजारी पडण्याचे प्रमाण वाढले : रोग्यतज्ज्ञांचा काळजी घेण्याचा सल्ला

**पुणे | प्रतिनिधी**

शहरात सध्या ऑक्टोबर हीटमुळे उकाडा वाढला आहे. त्यातच ढगाळ वातावरण असून, पाऊसही पडत आहे. या खराब हवामानामुळे नागरिक आजारी पडण्याचे प्रमाण वाढले आहे. विषाणूजन्य संसर्गाच्या रुग्णांमध्ये वाढ झालेली आहे. विशेषत: लहान मुलांमध्ये आजारी पडण्याचे प्रमाण जास्त दिसून येत आहे.

शहरातील हवामान हे सध्या खराब असून, ते विषाणू संसर्गास पोषक ठरत आहे. यामुळे फ्ल्यूचा संसर्ग मोठ्या प्रमाणात वाढला आहे. सर्दी, ताप, थंडी आणि खोकला ही लक्षणे प्रामुख्याने रुग्णांमध्ये दिसून येत आहेत. याचबरोबर घसा दुखणे आणि अंगदुखी अशी लक्षणेही दिसून येत आहेत. तसेच, श्वसनविकाराच्या रुग्णांमध्येही वाढ होत आहे. श्वसनमार्गाला संसर्ग आणि खोकल्याचे प्रमाण वाढले आहे. विशेषत: दम्याच्या रुग्णांमध्ये हे प्रमाण अधिक आहे.



**काळजी काय घ्यावी?**

- लहान मुलांना दरवर्षी फ्ल्यू प्रतिबंधक लस द्यावी.
- सर्वांनी आजारी पडल्यानंतर मास्कचा वापर करावा.
- मूल आजारी पडल्यास त्याला शाळेत पाठवू नका.
- आजारी व्यक्तीला भरपूर पाणी पिण्यास द्या.
- बाहेरील खाद्यपदार्थ खाणे शक्यतो टाळा.
- लक्षणे दिसताच तातडीने डॉक्टरांकडून उपचार घ्या.

लहान मुलांमध्ये आजारी पडण्याचे प्रमाण अधिक असून, याबाबत बालरोगतज्ज्ञ डॉ. दिलीप सारडा म्हणाले की, लहान मुलांमध्ये फ्ल्यूचा संसर्ग जास्त दिसून येत आहे. सर्दी, ताप, खोकल्यासोबत अतिसाराची लक्षणे दिसून येत आहेत. मुले आजारी पडल्यास पालकांनी त्यांना शाळेत पाठविणे टाळावे. कारण शाळेत गेल्यानंतर ती इतर मुलांच्या संपर्कात येऊन आजाराचा प्रसार वाढण्याचा धोका असतो. सध्या रुग्णसंख्येत सुमारे ३० टक्के वाढ झालेली दिसून येत आहे. यामुळे पालकांनी मुलांच्या प्रकृतीवर बारकाईने लक्ष ठेवावे. मुलांमध्ये लक्षणे दिसल्यास तातडीने डॉक्टरांना दाखवावे.

ससून सर्वोपचार रुग्णालयातील औषधवैद्यकशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. रोहिदास बोरसे म्हणाले की, सध्याचे हवामान विषाणू संसर्ग वाढण्यास कारणीभूत ठरत आहे. यामुळे रुग्णसंख्या वाढताना दिसत आहे. डेंग्यू आणि चिकुनगुन्याचा संसर्ग कमी होऊ लागला असून, इतर विषाणूजन्य आजारांचा प्रादुर्भाव वाढत आहे. श्वसनविकाराचे रुग्णही वाढले असून, थंडी वाढल्यानंतर त्यात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. प्रामुख्याने ताप, सर्दी आणि अंगदुखी अशी लक्षणे दिसत असली तरी काही रुग्णांमध्ये न्यूमोनिया होत असल्याचे दिसत आहे. त्यामुळे लक्षणे दिसून येताच तातडीने उपचार सुरू करणे आवश्यक आहे.

**खराब हवामानामुळे त्रास**

सर्दी
खोकला
ताप
अंगदुखी
अतिसार
श्वसनास त्रास

# संलग्नतेअभावी बीबीए, बीसीए, बीबीएम, बीसीएम कॉलेज बंद

## अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेशी (एआयसीटीई) संलग्न असणे बंधनकारक : वारंवार सूचना देऊनही नियमांचे पालन नाही

**पुणे | प्रतिनिधी**

संगणक आणि व्यवस्थापन पदवी अभ्यासक्रम बॅचलर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन (बीबीए), बॅचलर ऑफ कम्प्युटर ॲप्लिकेशन (बीसीए), बॅचलर ऑफ बिझिनेस मॅनेजमेंट (बीबीएम), बॅचलर ऑफ कम्प्युटर मॅनेजमेंट (बीसीएम) कोर्स राबविणाऱ्या महाविद्यालयांना या शैक्षणिक वर्षापासून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेशी (एआयसीटीई) संलग्न असणे बंधनकारक करण्यात आले आहे. वारंवार सूचना देऊन देखील राज्यातील काही महाविद्यालयांनी संलग्नता न केल्याने शहरी आणि बहुतांश ग्रामीण भागातील महाविद्यालयांमधील हे चार कोर्सेस बंद झाले आहेत.

परिणामी हजारो विद्यार्थ्यांची उच्च शिक्षणासाठी मोठी अडचण झाली आहे. बीबीए, बीसीए, बीबीएम, बीएमएस हे कोर्सेस यापूर्वी संबंधित महाविद्यालयांकडून चालविले जात होते. यासाठी महाविद्यालयाकडून प्रत्येक विद्यार्थ्याकडून १० ते १२ हजार शैक्षणिक शुल्क आकारले जात होते. या वर्षापासून 'एआयसीटीई' ने हे चार कोर्सेस आपल्या अखत्यारित घेतले आहेत. त्यासाठी महाविद्यालयांना संलग्नता घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. परंतु राज्यातील काही महाविद्यालयांनी संलग्नता घेतली नसल्याची माहिती समोर आली आहे.



> ग्रामीण भागातील विद्यार्थांसाठी बीबीए (BBA), बीसीए (BCA) अभ्यासक्रम उपयुक्त आहेत. व्यावसायिक अभ्यासक्रमांमुळे मोठ्या प्रमाणात रोजगार, व्यवसायाच्या संधी निर्माण होतात. असे असताना ग्रामीण भागातील महाविद्यालयांमधील हे अभ्यासक्रम बंद होत असतील तर भारतीय अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने अतिशय घातक आहे.
>
> **- प्रा. डॉ. प्रवीण जाधव, सचिव, शिवाजी विद्यापीठ मॅनेजमेंट टीचर्स असोसिएशन (सुम्टा)**

पुणे, नाशिक, नगर, औरंगाबाद, कोल्हापूर, सांगली तर सातारा येथील महाविद्यालयांनी 'एआयसीटीई' संलग्नता आणि राज्य सरकारची मान्यता घेणे गरजेचे होते. परंतु संलग्नतेची प्रक्रिया पूर्ण केलेली नाही. दरम्यान बीबीए, बीसीए, बीबीएम, बीसीएम प्रवेशासाठी दोन वेळा 'सीईटी' घेण्यात आली. काही खासगी महाविद्यालयांनी संलग्नता केल्याने त्यांच्याकडील सर्व जागा भरल्या आहेत. दुसरीकडे राज्यभरातील ज्या महाविद्यालयांनी संलग्नता घेतली नाही, अशा महाविद्यालयांतील विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहिल्याची धक्कादायक बाब उघड झाली आहे.

विद्यार्थी प्रतिनिधी प्रफुल्ल सोनवणे म्हणाले, “राज्यभरात हजारो विद्यार्थ्यांनी सीईटी दिल्यानंतर विविध कोर्सेससाठी प्रवेश निश्चित केले. परंतु ज्या विद्यार्थ्यांनी सीईटी दिली नाही. त्यांचे प्रवेश संलग्नता प्रक्रिया न झालेल्या महाविद्यालयांमध्ये झाले. आता दोन महिन्यांनंतर हे कोर्स शिकविणाऱ्या शिक्षण संस्था आणि महाविद्यालयांची मान्यता रद्द झाल्याची धक्कादायक बाब उघड झाली आहे. त्यामुळे हजारो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य अंधारात गेले आहे. ज्यांनी फी भरली त्यांना फी परत दिली जावी. तसेच त्यांचे प्रवेश लगतच्या महाविद्यालयात केले जावे, अशी आमची मागणी आहे.”